# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक – ४११/२०२४ दिनांक- ०७/११/२०२४

## प्रेस नोट

## " ४ अग्नीशस्त्रे व ८ जिवंत काडतुस स्वत:जवळ बाळगणाऱ्या आरोपीतास अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष ०१, काशिमिरा यांना यश."

विधानसभा निवडणुक - २०२४ च्या अनुषंगाने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये विनापरवाना अग्निशस्त्र व शस्त्रे बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई करणे संदर्भात मा. पोलीस आयुक्त सो यांनी आदेश केले होते. तसेच विनापरवाना अग्निशस्त्रे, शस्त्रे बाळगु नयेत इ संदर्भात मा. पोलीस उपआयुक्त सो, मुख्यालय मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचेकडील जा.क्र. विशा/टे-१३/मनाईआदेश/२०२४-११७४८ दि. २१/१०/२०२४ अन्वये आदेश पारित केले आहेत.

दिनांक ०६/११/२०२४ रोजी सपोनिरी/प्रशांत गांगुर्डे यांना माहीती मिळाली की, मिरारोड पुर्व येथील मुंबई-अहमदाबाद हायवेवरील वेस्टर्न हॉटेल मध्ये वास्तव्यास असलेल्या इसमाकडे विनापरवाना गावठी पिस्तुल आहे. याबाबत मा. वरिष्ठांना माहीती देऊन सदर ठिकाणी दोन पंचांसह जाऊन शहानिशा करता, इसम नामे परमानंद रमेश म्हात्रे वय २७ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. नागपुर यांच्या ताब्यात खालील नमुद वर्णनाचे ४ गावठी पिस्टल व ८ जिवंत काडतुस मिळुन आले. त्याबाबत काशिगाव पोलीस ठाणे येथे ३८१/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ सह महा. पोलीस अधिनियम ३७(१)(क), १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

| अ.क्र. | रक्कम | मुद्देमालाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ५०,०००/- रु | किमतीची एक गावठी बनावटीचे लोखंडी पिस्टल त्याचे बॅरल लांबी १५ से.मी. त्याचा बोर व्यास १ से.मी. व त्याचा १२ सेमी सिल्व्हर रंगाचे बट असलेले व बटाच्या दोन्ही बाजुस चॉकलेटी रंगाचे प्लेट लावलेली, त्यामधील मॅगझीन काढुन पाहीली असता तिची लांबी १० सेमी व रूंदी ३ सेमी असलेली जु.वा.कि.सु |
| २. | ५०,०००/- रु | किमतीची एक गावठी बनावटीचे लोखंडी पिस्टल त्याचे बॅरल लांबी १५ से.मी. त्याचा बोर व्यास १ से.मी. व त्याचा १२ सेमी सिल्व्हर रंगाचे बट असलेले व बटाच्या दोन्ही बाजुस चॉकलेटी रंगाचे प्लेट लावलेली, त्यामधील मॅगझीन काढुन पाहीली असता तिची लांबी १० सेमी व रूंदी ३ सेमी असलेली जु.वा.कि.सु |
| ३. | ५०,०००/- रु | किमतीची एक गावठी बनावटीचे लोखंडी पिस्टल त्याचे बॅरल लांबी १५ से.मी. त्याचा बोर व्यास १ से.मी. व त्याचा १२ सेमी सिल्व्हर रंगाचे बट असलेले व बटाच्या दोन्ही बाजुस चॉकलेटी रंगाचे प्लेट लावलेली, त्यामधील मॅगझीन काढुन पाहीली असता तिची लांबी १० सेमी व रूंदी ३ सेमी असलेली जु.वा.कि.सु |
| ४. | ५०,०००/- रु | किमतीची एक गावठी बनावटीचे लोखंडी पिस्टल त्याचे बॅरल लांबी १५ से.मी. त्याचा बोर व्यास १ से.मी. व त्याचा १२ सेमी सिल्व्हर रंगाचे बट असलेले व बटाच्या दोन्ही बाजुस चॉकलेटी रंगाचे प्लेट लावलेली, त्यामधील मॅगझीन काढुन पाहीली असता तिची लांबी १० सेमी व रूंदी ३ सेमी असलेली जु.वा.कि.सु |
| ५. | ८,०००/- रु | किमतीचे २.५ सेमी लांबीचे, ७.६५ एमएम ची एकुण ०८ जिवंत काडतुसे पितळी कव्हर असलेले, प्रत्येकी १००० रु किमतीची, त्याचे मागील बाजुस अस्पष्ट काहीतरी लिहिलेले |

मिळुन आलेली अग्नीशस्त्रे सदर इसमाने कोठुन आणली व ती कोणास विक्री करणार होता याबाबत तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अतिरिक्त पोलीस आयुक्त सो मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील प्र.पो.निरी अविराज कुराडे, सपोनिरी प्रशांत गांगुर्डे, सपोनिरी पुष्पराज सुर्वे, सफौ निखील चव्हाण, सफौ संदीप शिंदे, सफौ राजु तांबे, पोहवा-पुष्पेंद्र थापा, पोहवा-समीर यादव, पो.हवा./ सचिन हुले, पो.शि. प्रशांत विसपुते, पोअं/गौरव बारी, पो.अं/सौरभ इंगळे, मसुब/किरण असवले यांनी केली आहे.

------ooooo-------